**ठळक बातम्या**

- केंद्र सरकार राज्यातल्या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी असल्याचं प्रधानमंत्र्यांचं मुख्यमंत्र्यांना आश्वासन

- राज्यात संरक्षण सामुग्रीच्या उत्पादनांचे ३ कॉरिडॉर विकसित करण्याला मंजुरी द्यावी अशी मुख्यमंत्र्यांची प्रधानमंत्र्यांकडे मागणी

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या ८ आणि ९ ऑक्टोबरला राज्याच्या दौऱ्यावर

- राज्य लोकसेवा आयोगाची येत्या रविवारी होणारी नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा आता येत्या ९ नोव्हेंबरला होणार.

**आणि**

- राज्यातल्या नऊ जिल्ह्यांसह पुणे घाट, सातारा घाट आणि कोल्हापूर घाट परिसरात उद्याकरता मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट

**<><><><>**

महाराष्ट्रातल्या आपद्ग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठिशी खंबीरपणे उभे राहू, असं आश्वासन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची आज नवी दिल्ली इथं भेट घेतली. राज्यातल्या अतिवृष्टी, पूरस्थिती आणि त्यातून शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीची माहिती त्यांनी यावेळी प्रधानमंत्र्यांना दिली, त्यावेळी प्रधानमंत्र्यांनी हे आश्वासन दिल्याचं फडणवीस यांनी माध्यमांना सागितलं.

- **- - होल्ड - -**

याशिवाय, महाराष्ट्रातले संरक्षण कॉरिडॉर, गडचिरोलीतील पोलाद उत्पादनासाठी सवलती, मुंबईत दहिसर इथल्या भारतीय विमानतळ प्राधिकरणाच्या जागेचं हस्तांतरण तसंच ईज ऑफ डुईंग बिझनेसच्या दृष्टीने राज्य सरकार करत असलेले उपाय इत्यादींबाबत अतिशय सविस्तर चर्चा प्रधानमंत्र्यांशी केल्याचंही फडणवीसांनी सांगितलं. गडचिरोली इथं पोलाद सिटीत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक येत असून, हा एक आकांक्षित जिल्हा आहे. महाराष्ट्र राज्य मायनिंग कॉर्पोरेशनला एरिया लिमिटमध्ये सवलत मिळावी, अशी विनंती

मुख्यमंत्र्यांनी मोदी यांच्याकडे केली आहे. गडचिरोलीत पोलाद उत्पादनाची प्रचंड क्षमता असून, हे पोलाद हरित पोलाद असेल आणि चीनपेक्षाही कमी किंमतीत हे पोलाद उपलब्ध होणार आहे. गडचिरोलीत जिल्हा नक्षलमुक्त करुन विकासाच्या अमाप संधी यातून निर्माण होणार आहेत. असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

राज्यात 10 शस्त्रास्त्र निर्मिती कारखाने आहेत. भारताला लागणाऱ्या एकूण शस्त्र आणि दारुगोळ्यापैकी 30 टक्के उत्पादन महाराष्ट्रात होतं. त्यामुळे महाराष्ट्र हे संरक्षण कॉरिडॉरसाठी प्रभावी क्षेत्र आहे. त्यामुळे महाराष्ट्रात तीन संरक्षण कॉरिडॉरसंदर्भात एक तपशीलवार सादरीकरण मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी प्रधानमंत्र्यांना दिलं. पुणे- अहिल्यानगर- छत्रपती संभाजीनगर, अमरावती- वर्धा- नागपूर- सावनेर, आणि नाशिक - धुळे या तिन्ही कॉरिडॉरच्या माध्यमातून मोठी गुंतवणूक राज्यात येणार असून, त्यामुळे मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होईल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. मुंबईत दहीसर इथल्या 58 एकर जागेची मालकी भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडे आहे. तिचं हस्तांतरण महानगरपालिकेकडे झाल्यास जागेचा सार्वजनिक वापरासाठी आणि विकासासाठी उपयोग करता येईल, असं ते म्हणाले.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या 8 आणि 9 ऑक्टोबर रोजी फिनटेक परिषदेसाठी मुंबईत येणार असून, नवी मुंबई विमानतळ आणि मेट्रो-3 या प्रकल्पांचा प्रारंभ करतील. तसंच मुख्यमंत्र्यांनी राज्याचे माजी राज्यपाल आणि विद्यमान उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांचीही भेट घेतली.

**<><><><>**

राज्यात अतिवृष्टीग्रस्त नागरिकांना सरकारकडून मदत पोहोचवली जात असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली आहे. पुण्यात आज ते वार्ताहरांशी बोलत होते. राष्ट्रीय आपत्ती निवारण निधीतून भरीव मदत देण्याबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना निवेदन दिल्याचंही पवार यावेळी म्हणाले. पुराच्या पाण्यामुळे नुकसान झालेल्यांना ५ हजार रुपये आर्थिक मदत आणि १० किलो धान्य दिलं जाणार आहे. गरजेनुसार, धान्याची मदत वाढवण्याचेही प्रयत्न सुरू असल्याची माहिती पवार यांनी वार्ताहरांना दिली.

**<><><><>**

एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांना दोन हजार रुपये भाऊबीज म्हणून भेट दिली जाणार आहे, अशी माहिती महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. यासाठी ४० कोटी ६१ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असल्याचंही त्या म्हणाल्या. अंगणवाडी सेविका आणि मदतनीस या महिला आणि बालकांच्या संगोपनासाठी, पोषणासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी महत्वाची सेवा बजावत आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी ही भाऊबीजेची रक्कम भेट स्वरूपात मंजूर केली आहे. त्यांचा सण आनंदी व्हावा हीच आमची भूमिका आहे, असेही त्यांनी सांगितले.

**<><><><>**

सेवा आणि सुशासन या मंत्राच्या आधारे वाटचाल करत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकार परिवर्तन आणि प्रगती घडवून आणण्यासाठी अथक प्रयत्न करत आहे. सेवा पर्वच्या या विशेष मालिकेअंतर्गत आज अंतराळ क्षेत्राला अभूतपूर्व उंचीवर नेण्यासाठी केलेले प्रयत्न आज जाणून घेऊया...

\- **- व्हीसी - -**

*(प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने अंतराळ क्षेत्रात एकामागून एक टप्पे गाठले आहेत. हाफ-क्रायोजेनिक इंजिन आणि इलेक्ट्रिक प्रोपल्शनमुळे अंतराळ तंत्रज्ञान क्षेत्रात प्रगती झाली आहे. भारताने काही काळापूर्वी अंतराळात डॉकिंग अर्थात उपग्रह जोडणी आणि अनडॉकिंग म्हणजेच उपग्रहांचं विलगीकरण यशस्वीरित्या पूर्ण केलं. ग्रुप कॅप्टन शुभांशु शुक्ला यांचा अंतराळातला यशस्वी प्रवास हे भारताच्या पहिल्या मानवसहित अंतराळ मोहिमेच्या दिशेने टाकलेलं पहिलं पाऊल आहे. २०३५पर्यंत अंतराळस्थानक उभारण्याचीही योजना आहे. पायाभूत सुविधा नियोजनात उपग्रह-आधारित कृषी क्षेत्राला साहाय्य करणं, मच्छिमारांची सुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन अशा क्षेत्रात भारताने प्रगतीचे नवे टप्पे गाठले आहेत.)*

**<><><><>**

ॲप-आधारित वाहनचालकांनी नियमांचं पालन न केल्यास कठोर कारवाई करण्यात येईल. यासाठी परिवहन विभाग आणि मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण यांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.

मुंबईत अनेक ॲप-आधारित वाहनं प्रवाशांकडून मनमानी भाडे वसूल करत असल्याच्या तक्रारींनंतर परिवहन विभागाने थेट कारवाईचा बडगा उगारला आहे. गेल्या काही दिवसांत २६३ अवैधरीत्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर तब्बल ३ लाख ८८ हजार इतका दंड ठोठावण्यात आला आहे.

सरनाईक म्हणाले की, शासनाच्या निर्णयानुसार ॲप-बेस वाहने चालविण्यासाठी चालकांकडे वैध परवाना असणे तसेच चालकांना भाड्याच्या रकमेपैकी ८० टक्के भाडे देणे बंधनकारक असून, प्रवाशांकडून ठरविलेल्या दरापेक्षा जास्त भाडे आकारता येणार नाही.

**<><><><>**

राज्य लोकसेवा आयोगाची येत्या रविवारी होणारी नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा पुढं ढकलण्यात आली असून ती आता येत्या ९ नोव्हेंबरला होईल. राज्यातल्या अनेक भागात अतिवृष्टी आणि पूरपरिस्थितीमुळे अनेक गावांचा संपर्क तुटला असून येत्या दोन दिवसात पुन्हा अतिवृष्टीचा इशारा हवामान विभागाने दिला असल्यामुळे, ही परीक्षा पुढं ढकलण्याची मागणी शासनाकडे होत होती. त्यानुसार राज्यसरकारने आयोगाला विनंती केल्यामुळे हा बदल झाला आहे.

९ नोव्हेंबरला गट - ब अराजपत्रित सेवा संयुक्त परीक्षा नियोजित होती. ती या बदलामुळे पुढं ढकलली असून त्याची सुधारित तारीख नंतर जाहीर करु, असं लोकसेवा आयोगाच्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><>**

धुळे जिल्ह्यातल्या रोहिणी ग्रामपंचायतीला डिजिटल गव्हर्नन्स क्षेत्रातल्या उत्कृष्ट कामगिरीसाठी राष्ट्रीय ई गव्हर्नन्स परिषदेचा प्रथम क्रमांकाचा पुरस्कार मिळाला आहे. आंध्र प्रदेशात विशाखापट्टणम इथं नुकताच २८ व्या राष्ट्रीय ई गव्हर्नन्स परिषदेत हा पुरस्कार प्रदान केला गेला. यंदा पहिल्यांदाच या परिषदेतर्फे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी हे पुरस्कार दिले असून १० लाख रुपये रोख, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र असं या पुरस्काराचं स्वरुप आहे.

**<><><><>**

नशा मुक्त नवी मुंबई अभियान या कार्यक्रमाअंतर्गत नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाने ३५ गुन्ह्यांमधे जप्त केलेले २६ कोटी ४८ लाख रुपयांचे अंमली पदार्थ आज नष्ट करण्यात आले.

अंमली पदार्थाच्या अनुषंगाने पोलीसांना माहिती द्यायची असेल तर ८८२८ ११२ ११२ हा हेल्पलाईन क्रमांकावर मंपर्क साधावा असं आवाहन नवी मुंबई पोलिसांनी केलं आहे.

**<><><><>**

धुळे शहरात 'एमडी ड्रग सदृश' अमली पदार्थासह दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. दहा लाख रुपयांच्या अमली पदार्थांसह एकूण १७ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. पुढचा तपास सुरु आहे.

**<><><><>**

केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज दूरस्थ पद्धतीनं प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, पीएम-किसान योजनेचा २१ वा हप्ता लाभार्थ्यांच्या खात्यात जमा केला. २ लाख ७० हजार महिला शेतकऱ्यांसह २७ लाखांहून अधिक शेतकऱ्यांच्या बँक खात्यात एकूण ५४० कोटींहून अधिक रुपये हस्तांतरित करण्यात आले आहेत, अशी माहिती केंद्रीय कृषी मंत्र्यांनी दिली. पूर आणि भूस्खलनाचा मोठा फटका बसलेल्या हिमाचल प्रदेश, पंजाब आणि उत्तराखंडमधील शेतकऱ्यांना हा हप्ता प्राधान्याने देण्यात आला आहे. फेब्रुवारी २०१९ मध्ये ही योजना सुरू झाल्यापासून या तिन्ही राज्यांना १३ हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी वितरित केला आहे, असं कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने सांगितलं.

दरम्यान, केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज नवी दिल्ली इथं रशियाचे उपपंतप्रधान दिमित्री पात्रुशेव याची भेट घेत कृषी आणि अन्न सुरक्षा क्षेत्रात परस्पर सहकार्यावर चर्चा केली.

**<><><><>**

केंद्र सरकारनं अलिकडेच वस्तू आणि सेवा करात केलेल्या सुधारणा म्हणजे भारताच्या अप्रत्यक्ष कर व्यवस्थेच्या सुलभीकरणाच्या दिशेनं एक महत्त्वाचं पाऊल ठरल्या आहेत. आजच्या भागात ऐकूया सर्वसामान्यांना उपयुक्त ठरणाऱ्या विविध साहित्यावरच्या जीएसटी करांविषयी...

**- - व्हीसी - -**

*(केंद्र सरकारने विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणाऱ्या विविध स्टेशनरी साहित्यावरचा जीएसटी कमी केल्याने आता सामान्यांवरचा शैक्षणिक खर्च कमी व्हायला मदत होणार आहे. या सुधारणांतर्गत वह्या, आलेख वही, गिरमिट, पेन्सिल अशा विविध वस्तू पूर्णपणे करमुक्त केल्या आहेत. त्यामुळे हे साहित्य अधिक परवडणाऱ्या किमतीत उपलब्ध होणार आहेत. तसंच, अडीच हजार रुपयांपेक्षा कमी विक्री मूल्य असलेल्या पादत्राणांवरच्या जीएसटीतही कपात करण्यात आली आहे. यासोबत लाकूड, दगड, धातूंपासून बनवलेल्या वस्तूंवरही करांचा दर ५ टक्क्यांपर्यंत कमी केला आहे. )*

**<><><><>**

बुलढाणा जिल्ह्यात आदिवासी, पारधी, भटक्या विमुक्त जातींच्या मागण्यांसाठी भूमी मुक्ती मोर्चा या संघटनेच्या माध्यमातून आज खामगाव इथल्या उपविभागीय कार्यालयासमोर आंदोलन केलं. तत्पूर्वी आंदोलकांनी खामगाव शहरातून मोर्चा काढला. मोर्चेकऱ्यांनी आपल्या मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकाऱ्यांकडे सादर केलं.

**<><><><>**

माजी प्रधानमंत्री दिवंगत डॉ. मनमोहन सिंग यांच्या जयंती निमित्त प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह अनेक नेत्यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. डॉ. मनमोहन सिंग यांनी दीर्घ सार्वजनिक जीवनात राष्ट्रासाठी दिलेल्या योगदानाची आठवण कायम स्मरणात राहील. सिंग यांनी अर्थमंत्री म्हणून दिलेल्या योगदानाचे विशेषतः देशाच्या विकासासाठी महत्त्वाचे असल्याचे मोदी यांनी आपल्या समाज माध्यमावरील सदेशात म्हटलं आहे.

**<><><><>**

डिजिटल युगाच्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांनी बदलत्या तंत्रज्ञानाचा अवलंब करावा, त्या संदर्भातील सुविधा शेतकऱ्यांना उपलब्ध करून द्याव्यात, असे आवाहन जलसंपदामंत्री आणि अहिल्यानगरचे पालकमंत्री डॉ.राधाकृष्ण विखे पाटील आज केले.

अहिल्यानगर जिल्ह्यातल्या विविध विकासकामांचे भूमिपूजन, उद्घाटन डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.

**<><><><>**

नवी मुंबईतल्या कोपरखैरणे विभागात विविध नागरी समस्यांकडे प्रशासनाचं लक्ष वेधून घेण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं आज  जनआक्रोश मोर्चा काढला.

अहिल्याबाई होळकर माता बाल रुग्णालयाचं कार्यान्वयन,  खराब रस्ते-पदपथ, मलेरिया डेंग्यू ची साथ, अतिक्रमण , उद्यानाची दूरवस्था, इत्यादी मागण्या यावेळी करण्यात आल्या.

**<><><><>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज सुपर फोर मालिकेतला तिसरा सामना भारत आणि श्रीलंकेदरम्यान होईल. दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर रात्री ८ वाजता सामना सुरू होईल. भारत आधीच अंतिम फेरीत पोहोचला आहे, तर पाकिस्तानने काल बांगलादेशला ११ धावांनी हरवून अंतिम फेरीत प्रवेश केला. त्यामुळे भारत आणि पाकिस्तान यांच्यात येत्या रविवारी अंतिम सामना होईल.

**<><><><>**

छत्तीसगड राज्यात मुसळधार पाऊस पडल्याने भामरागडनजीकच्या पर्लकोटा नदीच्या पुलावरुन पाणी वाहू लागलं होतं. त्यामुळे आज सकाळपासून दिवसभर भामरागड-आलापल्ली मार्ग  बंद होता. मात्र, संध्याकाळी साडेपाचच्या सुमारास पूर ओसरल्याने वाहतूक सुरु झाली. गेल्या चोवीस तासात सिरोंचा तालुक्यात सर्वाधिक सुमारे ७० मिलिमीटर पाऊस पडला. आज दुपारी गडचिरोली शहरासह काही भागात प्रचंड मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह अर्धा तास पावसाने हजेरी लावली.

**<><><><>**

हिंगोली जिल्ह्यातल्या कळमनुरी आणि वसमत तालुक्यात सततच्या पावसामुळे केळी पिकाचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे. जिल्ह्यात गेल्या दोन महिन्यांपासून मुसळधार पाऊस पडत असून फळबागांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनानं त्वरित निर्णय घ्यावा अशी स्थानिकांकडून मागणी करण्यात येत असल्याचं आमच्या बातमीदारानं कळवलं आहे.

सोलापूर जिल्ह्यात सीना नदी वडकबाळ येथे धोका पातळीच्यावर वाहत आहे. तर टाकळी येथे भीमा नदी इशारा पातळीच्यावर वाहत असल्याने खबरदारीचा उपाय म्हणून

सोलापूरमधे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाची दोन पथके तैनात आहेत. तसेच सचेतच्या माध्यमातून नागरिकांना सतर्कतेच्या पूर्व सूचना देण्यात आल्या आहेत.

**<><><><>**

येत्या दोन दिवसात राज्यात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता असून कोकण किनारपट्टीवर सोसाट्याचे वारे वाहण्याची शक्यता आहे. राज्यात नांदेड, लातूर, धाराशिव, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर या नऊ जिल्ह्यांसह पुणे घाट, सातारा घाट आणि कोल्हापूर घाट परिसरात उद्यासाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

**//<><><><>//**